ISSN 2231-1629
Knowledge Resonance

*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*
**IMPACT FACTOR 8.072**

# भारतीय पंतप्रधानाचे परराष्ट्र धोरण

**डॉ. शरद सांबारे**
*राज्यशास्त्र विभाग प्रमुख*
*यशोदा गर्ल्स आर्ट्स & कॉमर्स कॉलेज, नागपूर*

**सारांश:-**
*भारत साधारण २०० वर्ष ब्रिटीशांच्या राजवटीत होता त्यामुळे भारताला स्वतंत्र परराष्ट्र धोरणाची आखणी करता आली नाही. मात्र भारत स्वतंत्र झाल्यावर १७ वर्ष पंडित नेहरूंनी परराष्ट्र व्यवहार सांभाळले. त्याहीपूर्वी कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथात भारताच्या परराष्ट्र धोरणाची काही चिन्हे दिसून येतात. विसाव्या शतकापासून परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासाला शास्त्रशुद्ध पद्धतीने सुरुवात झाली. प्रथम महायुद्ध आणि द्वितीय महायुद्ध दरम्यान वसाहवाद, राष्ट्रीयहीताचे साध्यीकरण, शास्त्रांची स्पर्धा, गटबाजी, मतभेद, संघर्ष आणि युद्धजन्य परिस्थिती मोठ्या प्रमाणात वाढले होते. राष्ट्रहित हे परराष्ट्र धोरणाचा गाभा आहे दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची दोन गटांमध्ये विभागणी झाली आणि साम्यवादी व भांडवलवादी या गटांमध्ये शितयुद्धास सुरुवात झाली. भारताने मात्र कोणत्याही गटात न जाता अलिप्ततावादी धोरणाचा स्वीकारून आपले स्थान जगातील तरावर मजबूत करण्यास सुरुवात केली. नैसर्गिक आणि मानवी मार्यादेकडे बघून देश स्वयंपूर्ण होऊ शकत नाही त्याला अन्य देशांशी व्यवहार, आदान-प्रदान करावी लागते. त्यामुळे देशादेशातील संबंध दृढ होऊन आंतरराष्ट्रीय संबंध मजबूत होतात. आंतरराष्ट्रीय संबंध भक्कम होताच त्या देशासोबत असणाऱ्या व्यवहाराला गती प्राप्त होते. स्वतंत्र आणि सार्वभौम राष्ट्र होण्याकरिता राष्ट्राने आपली कार्यक्षमता सिद्ध करणे गरजेचे आहे तरच सार्वभौमत्वाची संकल्पना सिद्ध करता येते. परराष्ट्र धोरण हे व्यक्ती आणि परिस्थितीसापेक्ष असतात त्यामुळे त्यामध्ये गतिमानता दिसून येते आणि राष्ट्राची प्रमुख उद्दिष्टे, मुल्ये आंतरराष्ट्रीय समुदायापुढे परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून मांडली जातात. राष्ट्रांमधील वर्तणुकीचे नियम ठरविताना आंतरराष्ट्रीय स्तरावर ची परिस्थिती लक्षात घेतली जातात. परराष्ट्र धोरणाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे राष्ट्राचे स्वतंत्र जपणे, सार्वभौमत्व, अंतर्गत व बाह्य सुरक्षा जपणे होय. या घटकांना टिकवण्यासाठी राष्ट्र आपल्या व्यवहारातून दुसऱ्या राष्ट्रांशी व्यवहार करतात. कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्र धोरण तेथील केंद्रीय सरकार ठरवितात. परराष्ट्र धोरण इतर राष्ट्राच्या प्रभावापासून मुक्त असावे, अशी प्रत्येक राष्ट्रांची इच्छा असते. परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून जागतिक पटलावर आपली उद्दिष्टे ठेऊन ती साध्य करण्याचा सातत्याने प्रयत्न करतात. परराष्ट्र धोरणाला प्रभावित करणारे घटक आणि परराष्ट्र धोरणाचे मूलभूत तत्व यांचा समतोल साधून राष्ट्राची ध्येयधोरणे ठरविण्यास मदत होते. तिसऱ्या जगाच्या गटांमध्ये भारताला अधिक व्यापक भूमिका बजावण्याची गरज आहे आणि संधीपण आहे, त्यासाठी भारताचे आदर्शवादी भूमिकेतून बाहेर पडून वास्तववादाची कास धरावी लागेल. कोविड महामारीच्या साथीमुळे जवळपास सर्वच देशाचे नुकसान मोठ्या प्रमाणात झाले आहे. हे नुकसान भरून काढण्यासाठी भारताला जागतिक स्तरावर प्रयत्ना सोबतच इतर राष्ट्रांशी सहकार्य आणि व्यवहार मजबूत करावे लागेल. चीन, अमेरिका, रशिया, इराक, इराण, अफगाणिस्तान यांच्याशी संबंधाला अधिक घट्ट कसे करता येईल, यावर भर देणे गरजेचे आहे. तिसऱ्या जगातील देश भारताकडे आशेचा किरण म्हणून नेहमीच बघतांना दिसून येते. लडाखमध्ये चीन बरोबर निर्माण झालेला संघर्ष, चीनला अटकाव करण्यासाठी 'क्वाड' गटाच्या स्थापनेला आलेला वेग, अमेरिकेची भारताने केलेला 'बेका' करार यासह अन्य काही घडामोडींवर अनेक देशांचे लक्ष आणि यासंबंधी मोठ्या प्रमाणात चर्चा हा एक विषय परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे.*

**भारतातील परराष्ट्र धोरण:-**

स्वतंत्र भारताच्या परराष्ट्र धोरणाची सुरुवात भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर पंडित नेहरूंच्या काळापासून सुरु झाली. नेहरूंना भारताचे परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणून संबोधले जातात.[१] नेहरुंच्या परराष्ट्र धोरणाची प्रामुख्याने तीन तत्वे दिसून येतात आणि याच तत्वांच्या आधारावर भारताचे परराष्ट्र धोरण त्यांच्या काळात दिसून येतात. स्वतंत्र परराष्ट्र धोरण अलिप्ततावाद

आणि तिसर्या जगाचे ऐक्य या तत्त्वावर भारताचे परराष्ट्र धोरण आधारित आहे. मोडलस्की यांनी परराष्ट्र धोरणाच्या संदर्भात आपले मत व्यक्त करताना म्हटले की, परराष्ट्र धोरण हे अशा क्रियांचा समुह होय कि, जे अन्य राष्ट्रांच्या व्यवहारात बदल करण्यासाठी आणि आपल्या क्रियांना आंतरराष्ट्रीय परिस्थितीसोबत समायोजित करण्यासाठी विकसित करणे होय.[२]

भारत एक शांतताप्रिय राष्ट्र आहे. भारताला गौतम बुद्ध, महात्मा गांधी आणि अनेक महात्म्यांचा वारसा आहे. त्यामुळे भारताने कधीही विस्तारवादी भूमिका घेतली नाही. नेहरूंचे परराष्ट्र धोरण हे आदर्शवादी विचारसरणीवर आधारित होते. अलिप्ततावाद हा भारताच्या परराष्ट्र धोरणाचा महत्त्वाचा घटक होता. शीत युद्धाच्या काळात नेहरूंची अलिप्ततावादची भूमिका हि काहींच्या मते राष्ट्रीय सुरक्षा धोरणाच्या दृष्टीने महत्वाची मानली जात होती. अमेरिका आणि रशिया या देशांतील शीतयुद्धात न पडता कोणत्या एका राष्ट्राची बाजु न घेता, दोन्ही राष्ट्र सोबत मैत्रीचे संबंध टिकवून ठेवण्यासाठी आणि अलिप्ततावादी धोरणाची भारताला मोठी मदत झाली.

**पंडित नेहरू नंतरचे भारताचे परराष्ट्र धोरण:-**

पंडित नेहरूंच्या निधनानंतर भारताचे पंतप्रधान लालबहादूर शास्त्रीकडे आले. याच काळात परराष्ट्र धोरणाला नवी दिशा मिळाली. भारत पाक युद्धामुळे इतर देशात भारताच्या सैनिकी शक्तीची जाणीव झाली. इंदिरा गांधीच्या कार्यकाळात परराष्ट्र धोरणाचा वास्तववादी काळ होता. अमेरिका-रशिया भेटीने या काळात दोन्ही राष्ट्रांशी परराष्ट्र व्यवहार होऊन संबंध मजबूत होत होते. याच काळात बांगलादेशच्या निर्मितीत इंदिरा गांधींची भूमिका महत्त्वपूर्ण दिसून येते. 1971 ला भारत-पाक युद्धाने आणि पाकिस्तानच्या पराभवाने भारताची प्रतिमा उंचावली. पोखरण येथे 1974 ला अनुचाचणीने भारताच्या परराष्ट्र धोरणाची दिशा बदलेली दिसून येते. राजीव गांधी यांच्या काळात 'सार्क' संघटनेच्या स्थापनेने भारताचे महत्व अजून वाढले. श्रीलंकेशी कराराने शांतिसेना पाठविणे हे परराष्ट्र धोरणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. पी. व्ही. नरसिंहराव यांनी 1992 नंतर म्हणजे शीतयुद्ध समाप्तीनंतर ते भारताचे पंतप्रधान होते. भारतासाठी त्यांनी जागतिकीकरणाचा स्वीकार केला. त्यामुळे आर्थिक घटकाला महत्त्व प्राप्त झाले. पूर्वेकडे पहा हे धोरण स्वीकारून पूर्वेकडील राष्ट्रांना महत्त्व प्राप्त करून दिले. अटलबिहारी वाजपेयी यांच्या काळात परराष्ट्र धोरणाला नवीन आयाम प्राप्त झाले. परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून राष्ट्रहित संबंधांना महत्व प्राप्त झाले याच काळात दुसरी अनुचाचणी यशस्वी झाली आणि संपूर्ण जगाला दाखवून दिले की, भारत सुद्धा अण्वस्त्रधारी आहे. 1999 ला कारगिल युद्धात विजय झालेला भारत पाकिस्तानची संबंध सुधारण्यासाठी सतत प्रयत्नशील होता. त्याचे फलित म्हणजे समझोता एक्सप्रेस ची सुरुवात होय. मनमोहन सिंग यांच्या काळातला 'लूक ईस्ट' पॉलिसीवर भर देण्यात आला. जॉर्ज बुश आणि मनमोहन सिंग यांच्यात नागरी अनु कराराच्या दृष्टीने प्रयत्न झाले. याच काळात शेजारी राष्ट्रांशी संबंधात दुरावा दिसून येतो, मात्र दहशतवाद जागतिक स्तरावर मांडण्यात भारत या काळात यशस्वी झाला. 2014 पासून म्हणजे मोदींच्या पंतप्रधानपदापासून आशियाई राष्ट्रांना त्यांनी महत्व दिले. पाकिस्तान व चीन यांच्या सोबत संबंध सुधारण्यासाठी आणि राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मोदी सरकार सुरक्षेला महत्त्व देत आहे. या काळात परराष्ट्र धोरण वास्तववादाला महत्त्व देत आहे. विविध देशांचे दौरे करून इतर देशांशी व्यापाराच्या दृष्टीने ही प्रयत्नशील आहे. अलीकडचा काळ हा राजकीय साम्राज्यवादाचा नसून आर्थिक साम्राज्यवादाचा आहे. जेव्हा भारताचे जागतिक व्यापार संघटनेचे महासत्तांच्या आर्थिक साम्राज्यवादी धोरनासाठी तीव्र विरोध केला आहे. त्यामुळे साम्राज्यवाद वसाहत वादाला विरोधी भारताचे परराष्ट्र धोरणाची ठळक वैशिष्ट्ये ठरले आहे.[३]

**संदर्भ ग्रंथ**


१. *देवळाणकर, शैलेंद्र. "भारतीय परराष्ट्र धोरण". जागतिक राजकारणातील भारताची भूमिका. (सं.पा.) नाईकवाडे, अशोक, राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन विभाग, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद, २०१४*

२. *कुमार महेंद्र, आंतरराष्ट्रीय राजनीती के सैद्धांतिक पक्ष, शिवलाल अग्रवाल अंड कंपनी, आग्रा, संशोधित संस्करण, पृ.क्र.- २९६*

३. *गाळगीळ त.पा., नवभारताचे शिल्पकार- पं. नेहरू, शुक्ला प्रकासन, मुंबई, १९९४, पृ.क्र.- २२७*